वाणिज्य विभाग

वार्षिक अहवाल 2025-2026

प्रथम **द्वितीय** व तृतीय वर्षातील प्रथम पाच विद्यार्थ्यांचे क्रमांक पुढील प्रमाणे.

प्रथम वर्ष - 2024-25

प्रथम क्रमांक-	**खिल्लारी प्रतीक्षा सुनील.**	**टक्केवारी-88.46**
द्वितीय क्रमांक -	**ठोंबरे मयुरी अनिल.**	**टक्केवारी 87. 86 .**
तृतीय क्रमांक-	**अन्सारी फातिमा खातून इजहार.**	**टक्केवारी 87.38.**
तृतीय क्रमांक-	**पाटे श्रद्धा संतोष.**	**टक्केवारी 87.38.**
चतुर्थ क्रमांक-	**शिंदे तन्वी ज्ञानेश्वर.**	**टक्केवारी 87.32**
पाचवा क्रमांक-	**भोर पायल अशोक.**	**टक्केवारी 85.70.**

द्वितीय वर्ष -2024-25

प्रथम क्रमांक-	**टेमगिरी साक्षी विजय.**	**टक्केवारी 80.84**
द्वितीय क्रमांक-	**पटेल नामिरा सलाउद्दीन.**	**टक्केवारी79.76**
तृतीय क्रमांक-	**मोरडे समृद्धी नवनाथ.**	**टक्केवारी 79.22**
चतुर्थ क्रमांक-	**डुकरे तनुजा विकास.**	**टक्केवारी 78.92**
चतुर्थ क्रमांक-	**नेहरकर मयुरी विलास.**	**टक्केवारी 78.92**
चतुर्थ क्रमांक-	**शिरतार मंगेश.**	**टक्केवारी 78.92**
पाचवा क्रमांक-	**गुजर अनन्या पृथ्वीराज.**	**टक्केवारी 78.08**

तृतीय वर्ष-2024-25

प्रथम क्रमांक-	पानमंद प्राजक्ता गोरक्ष.	टक्केवारी- 84.20
द्वितीय क्रमांक-	भोर ऐश्वर्या खंडू.	टक्केवारी 81.80
तृतीय क्रमांक-	विशे दिपाली दत्तात्रेय.	टक्केवारी 80.60
चतुर्थ क्रमांक-	वाघ प्रीतम संतोष.	टक्केवारी-80.24
चतुर्थ क्रमांक-	वाघ साक्षी रवींद्र.	टक्केवारी-80.24.
पाचवा क्रमांक-	मिसाळ साक्षी अविनाश.	क्केवारी- 79.76
पाचवा क्रमांक-	नेहरकर श्रुती रवींद्र.	टक्केवारी -79.76

2025-26 या वर्ष वर्षात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

23 जुलै 2025 -"One Day Workshop Introduction of National Education Policy NEP "– 23/7/2025

ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ना.गाव वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र चित नवीन शैक्षणिक धोरण 2020 या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कुलकर्णी सरांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्व स्पष्ट करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. वाणिज्य विभाग समन्वय प्रो. डॉ. एस.डी टाकळकर सरांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे सविस्तर मांडणी करून आपला हा शैक्षणिक प्रवास कोणत्या पद्धतीने होणार आहे याबद्दल माहिती देऊन मार्गदर्शन केले.व्यवसाय प्रशासन प्रमुख डॉ. ए. आर . घुमटकर यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये नवीन विविध विषयांच्या असलेल्या संधी यावर मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. डॉ. जे. पी .भोसले वाणिज्य संशोधन केंद्रप्रमुख यांनीही कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या .डॉ. व्ही .टी. पाटे यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची रचना नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये झालेला बदल अंतर्गत गुणदान पद्धतीमध्ये झालेल्या बदल, गुणदान पद्धती या विविध विषयावर PPT द्वारे सादरीकरण केले.

डॉ.जगदाळे यांनी विद्यार्थ्यांनी 3 वर्ष शिक्षण घेऊन पदवी पूर्ण केल्यास त्यांना Honours Degree डिग्री प्रदान होईल 4 वर्ष B.Com पूर्ण केल्यानंतर Research Honours ही डिग्री विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना मिळेल तसेच विद्यार्थ्यांना Accountancy, Costing , Banking, B.E. असे विविध विषय घेऊन डिग्री स्पेशल विषयानुसार पूर्णकरतायेईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद पाटे यांनी केले तर आभार डॉ. आबा जगदाळेयांनी मानले कार्यक्रमाचे संयोजन डॉक्टर वैशाली मोढवे प्रा. सविता खरात,प्रा. अपेक्षा शिंदे यांनी केले.

29 जुलै 2025 "करियर कौन्सिलिंग सेमिनार ऑन कॉस्ट मॅनेजमेंट अकाउंट "-29/7/2025

ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव वाणिज्य विद्या शाखा व संशोधन केंद्र आयोजित करिअर कौन्सिलिंग सेमिनार ऑन कॉस्ट मॅनेजमेंट अकाउंट या विषयावर सेमिनार घेण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चेअरमन पिंपरी चिंचवड चाप्टर त इन्स्टिट्यूट ऑफ अकाउंटंट ऑफ इंडिया सी एम ए अजित शिंदे यांनी विद्यार्थ्यांना सीएमए या कोर्स विषयी म्हणजेच अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सीएमए केल्यानंतर प्लेसमेंट सुविधा भविष्यामध्ये सी एम ए मधील नोकरीच्या संधी या कोर्स साठी असणारी एकूण फी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एपी कुलकर्णी यांनीही कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. वाणिज्य विद्या शाखेचे प्रमुख प्रो .डॉ. एस.डी. टाकळकर सरांनी ही कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख व्यवसाय प्रशासन प्रमुख डॉ. ए .आर घुमटकर यांनी केली कार्यक्रमासाठी वाणिज्य संशोधन केंद्रप्रमुख डॉ. जे.पी भोसले उपस्थित होते कार्यक्रमाचे डॉक्टर सारिका जगदाळे यांनी केले तर आभार डॉक्टर वैशाली मोढवे यांनी मानले .कार्यक्रमाचे संयोजन डॉ. विनोद पाटे ,डॉ. आबा जगदाळे, प्रा. सविता खरात , प्रा.अपेक्षा शिंदे यांनी केले.

5 ऑगस्ट 2025 "द्वितीय वर्ष एनएपी प्रोग्राम एस बीकॉम"- 5/8/2025

ग्रामोन्नती मंडळ कला व वाणिज्य विज्ञान विभाग व संशोधन केंद्र आयोजित द्वितीय वर्ष एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. ए.बी .कुलकर्णी सर यांनी कार्यक्रमास

शुभेच्छा दिल्या वाणिज्य विभाग समाधान डॉ.एस.डी .टाकळकर सरांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये झालेले बदल पीपीटी द्वारे स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आता कोणते विषय निवडावे मेजर व मायनर या विषयावर सविस्तर माहिती देण्यात आली. डॉ.घुमटकर मॅडम यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्ही. टी. पाटे सर यांनी केले व या कार्यक्रमाचे आभार डॉ. आबा जगदाळे सर यांनी मानले.कार्यक्रमाचे संयोजन वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापकांनी केले.

6 ऑगस्ट 2025 "नारायणगाव महाविद्यालयात स्वागत समारंभाचे आयोजन"-6/8/2025

नारायणगाव महाविद्यालयात वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र आयोजित स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए .बी कुलकर्णी सर वाणिज्य विद्या शाखेचे समन्वयक व विभाग प्रमुख डॉ एस . डी. टाकळकर सर तसेच संशोधन केंद्र प्रमुख डॉ. जे. पी भोसले सर व्यवसाय प्रशासन प्रमुख डॉ. घुमटकर मॅडम आधी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आनंद कुलकर्णी सर यांनी मुलांना महाविद्यालयातील वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी होण्याचे तसेच शिस्तीचे पालन करण्याचे आणि वर्गात उपस्थित राहण्यास सांगितले आणि कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. डॉ. एस. डी टाकळकर सरांनी मुलांना शिस्तीचे पालन करावे अपयश पचवता आलं पाहिजे आणि तुमची जी काही ध्येय आहे ते साकार करण्याचा प्रयत्न करा असे आवाहन करण्यात आले. तसेच डॉ. जे.पी भोसले सरांनी मुलांना छोट्या छोट्या गोष्टींमध्ये व्यवस्थापन करता आले पाहिजे नवीन उपक्रम राबवण्यासाठी महाविद्यालय नेहमी तत्पर असणार आहे चांगल्या गोष्टी करत राहा तुमची स्वप्न तुम्ही प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करा यश तुमच्या हातातच आहे असे सांगितले . घुमटकर मॅडम यांनी मुलांना महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना सामाजिक प्रतिष्ठा जपून स्वतःमध्ये मूल्यांची रुजवणूक करण्यास आणि ती विकसित करण्यास सांगितले तसेच डॉ. वैशाली मोढवे मॅडम यांनी मुलांना भविष्यामध्ये तुम्हाला खूप साऱ्या संधी असून वाणिज्य विभाग कायम तुमच्यासाठी तत्पर असणार आहे असे सांगितले. या कार्यक्रमामध्ये शेळके आदिती, खिल्लारी प्रतीक्षा, मुळे प्राची, कहर निकिता, मुळे ऋतुजा, ढोबळे कांचन, अनन्या गुजर, खरात क्षितिजा यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमांमध्ये काही खेळांचे आयोजन करण्यात आले होते त्या खेळांमध्ये मुलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदवला .ऐश्वर्या देशमुख, संध्या सिंग ,स्नेहल कोल्हे, अशोक जायभाये या मुलांनी स्पर्धा जिंकली या स्पर्धेत जिंकलेल्या मुलांना बक्षिसाचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाहिद शेख या विद्यार्थ्याने केले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. विनोद पाटे डॉ. आबा जगदाळे डॉ. वैशाली मोढवे डॉ. सारिका

जगदाळे प्रा. सविता खरात प्रा.अपेक्षा शिंदे यांनी केले. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुरी नेहरकर आणि शिंदे काजल या विद्यार्थिनींनी केले आणि आभार खंडागळे दिशा या विद्यार्थिनींनी मानले.

4 SEPTMBER 2026 -"शिक्षक दिन"- 4/9/2025

ग्रामोन्नती मंडळाचे कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व वाणिज्य विभाग संशोधन केंद्र आयोजित शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए बी कुलकर्णी यांनी शिक्षक दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या .प्रमुख पाहुणे(प्रेसिडेंट रोटरी क्लब नारायणगाव हायवे) रो. डॉ.उत्तम घोरपडे यांनी शिक्षक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थी एक कोणी पाटी असते त्या पाटीवर सुंदर डिझाईन करण्याचे काम मात्र शिक्षक करत असतात.शिक्षक हे नुसते शिकवत नाही तर ते शिकवून सुसंस्कृत करतात त्यामुळे इतरांना समाजात बोलताना वागताना या पायाभरणीचा उपयोग करून नम्रता गुण घेऊन पुढे जा. असा संदेश सर्वांना दिला. वाणिज्य विभाग समन्वयक डॉ. एस.डी टाकळकर सर यांनी आयुष्यामध्ये चांगलं बोलता आले पाहिजे आणि यशस्वी जीवन जगण्याचा प्रयत्न करा स्वतःला विकसित करा watch म्हणजे W=work चांगले कार्य करा. A= Action कृती करा. T= though. चांगले विचार जोपासा.

C= character चारित्र्य चांगले ठेवा. H= habits वाईट सवयी सोडून चांगल्या सवयी स्वतःमध्ये रुजवा. वाणिज्य संशोधन केंद्रप्रमुख डॉ. जे.पी. भोसले सर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षकांना शुभेच्छा देताना आयुष्यभर आपण शिक्षकच आहोत अशी उपमा सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांना दिली.व्यवसाय प्रशासन प्रमुख डॉ. अनुदाना घुमटकर मॅडम यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस हा जगभरात साजरा केला जातो .चांगले करिअर करा व चांगला शिक्षकांचा सन्मान करा.मांडे सानिका, शिंदे काजल, गुजर अनन्या, मुळे प्राची , रोटे वैष्णवी, भोर समीरा, मंगेश बडे, वैष्णव, अन्सारी फातिमा, खिल्लारी प्रतीक्षा या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त मनोगत व्यक्त केली.या शिक्षक दिनाच्या निमित्ताने अनन्या गुजर हिने प्राचार्य म्हणून भूमिका बजावली क्षितिजा खरात वाणिज्य विभाग प्रमुख हांडे पायल वाणिज्य संशोधन केंद्रप्रमुख म्हणून भूमिका बजावली तर विद्यार्थी शिक्षक म्हणून एकूण 40 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.या कार्यक्रमाचे एकूण 200 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला या कार्यामध्ये उपस्थित महाविद्यालयातील प्रा. कुडेकर, प्रा. डॉक्टर मेहेर,प्रा.अक्षय वाजगे, प्रा.निलेश गावडे, डॉ.कुटे सर, प्रा. साक्षी गायकवाड ,रूपाली वरपे व महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक खिलारी प्रतीक्षा हिने केले सूत्रसंचालन शिंदे काजल, खरात क्षितिजा यांनी केले.कार्यक्रमांचे संयोजन डॉ.व्ही.टी.पाटे ,डॉ. जगदाळे, डॉ. जगदाळे ,प्रा. एस.बी. खरात, प्रा.अपेक्षा शिंदे यांनी केले.कार्यक्रमाचे

सूत्रसंचालन शिंदे काजल ,खरात क्षितिजा यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार हांडे पायल हिने मानले.

20 SEPTMBER 2026 "विशेष व्याख्यानमाला" -20/9/2025

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र आणि बीबीए, बीसीए विभागामार्फत दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. या विशेष व्याख्यानासाठी मा. प्रा. डॉ. CA एम. एच. जाधव (सदस्य अभ्यास मंडळ इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया, नवी दिल्ली) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण कसे घेतले पाहिजे याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात शिक्षणाला जीवनाचा स्पर्श झाला पाहिजे. आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत. त्यानुसार आपल्यामध्ये प्रेरणा जागृत करणे गरजेचे आहे, स्वतःला बदललले पाहिजे आणि मिळेल त्या परिस्थितीमध्ये संधीच सोन आपल्याला करता आले पाहिजे. आपल्या देहबोलीमधून आपला आत्मविश्वास दिसून येतो. आत्मविश्वास हा आपल्याकडे ज्ञान असेल तरच येतो. बी.कॉम. करत करत तुम्ही सर्वजण स्वतःच्या पायावर उभे रहा. असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला. आई वडिलांना त्यांच्या त्यागाचे फळ दिले पाहिजे, त्यांना विसरू नका. स्मार्ट काम करा. कष्ट करण्याची तयारी ठेवा. नेहमी स्वतःची डायरी जवळ ठेवा खर्च,उत्पन्न, हिशोब याचा आराखडा तयार करा आणि जीवनाचा आनंद घ्या.

आपल्या सुखी जीवनाचे गणित पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध होऊन मार्गक्रमण करण्यासाठी वेळेचा योग्य उपयोग, नियोजन करा. असे अनमोल मार्गदर्शन सरांनी विद्यार्थ्यांना केले. त्यानंतर आजच्या कार्यक्रमाचे दुसरे मी मार्गदर्शक मा. श्री. आर. आर. भोसले यांनी या विशेष व्याख्यानासाठी शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे प्रोफेसर व वाणिज्य संशोधन केंद्रप्रमुख डॉ. जे. पी. भोसले यांनीही या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. वाणिज्य विभाग समन्वय, प्रोफेसर डॉ. टाकळकर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि व मान्यवरांचे स्वागत केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात १५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमासाठी वाणिज्य विभागातील डॉ. व्ही.टी. पाटे, डॉ. ए.ए. जगदाळे, डॉ. मोढवे व्ही.एस., प्रा.एस.बी. खरात,डॉ. एस.ए. जगदाळे, प्रा. अपेक्षा शिंदे त्याचप्रमाणे बीबीए व बीसीए विभाग प्रमुख प्रा. ॲड. सुप्रिया निंबाळकर, प्रा. विकास भुजबळ, प्रा. सुयश पोखरकर इत्यादींनी कार्यक्रमाचे संयोजन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अजिंक्य भुजबळ यांनी केले व आभार डॉ. सौ. ए. आर. घुमटकर यांनी व्यक्त केले.

1 जानेवारी 2026-“नवीन वर्ष स्वागत समारंभ”-1/1/2026

ग्रामोन्नती मंडळाचे कला,वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नारायणगाव वाणिज्य विद्या शाखा व संशोधन केंद्र आयोजित नवीन वर्ष स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला प्रमुख पाहुणे प्राध्यापक डॉ. किशोर शेळके यांनी विद्यार्थ्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना चांगल्या गोष्टींचा संकल्प करा. प्रामाणिक राहा. रोज प्राणायाम योगा करा.आपल्या करिअरच्या दिशा निश्चित करा.असा संदेश दिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना सतत कार्यरत रहा. उत्तम आरोग्य जपा.सतत वाचन करा असा संदेश देऊन अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

वाणिज्यविद्या शाखाप्रमुख डॉ. एच.डी टाकळकर यांनी Happy New Year -2026 च्या शुभेच्छा देताना Happy या शब्दाचा अर्थ सांगून सर्वांना आनंदी राहण्याचा प्रयत्न करा असा संदेश व शुभेच्छा दिल्या वाणिज्य संशोधन केंद्र प्रमुख डॉ.जे.पी.भोसले यांनी विद्यार्थ्यांना चांगली उच्च रचना पहा व ती पूर्ण करा असे सांगून शुभेच्छा दिल्या इतिहास संशोधन केंद्र प्रमुख डॉक्टर उत्तम पठारे यांनी समाजाची आई वडिलांचे सेवा व आदर करा असा संदेश दिला.

डॉ. अनुराधा घुमटकर यांनी प्रस्ताविका मधून विद्यार्थ्यांना नाती जपा जोपासा व वाढवा असा संदेश दिला डॉ. सविता खरात यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे संयोजन डॉ.व्ही टी पाटील, डॉ.सारिका जगदाळे, प्रा. अपेक्षा शिंदे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैशाली मोडवे यांनी केले तर आभार डॉ. आबा जगदाळे यांनी मानले.

14 जानेवारी 2026- “मकर संक्रात तिळगुळ वाटप व विविध गुणदर्शन कार्यक्रम”

मकर संक्रात तिळगुळ वाटप व विविध गुणदर्शन कार्यक्रम ग्रामोन्नती मंडळांचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव. वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र आयोजित "मकर संक्रात व तिळगुळ वाटप विविध गुणदर्शन कार्यक्रम" उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सोशल मीडियारिल स्टार जयाबाई फेम शुभांगी रणदिवे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कॉलेज जीवनातील आठवणी सांगून विविध एक्टिंग ची कला विद्यार्थ्यांना पर्यंत पोषण स्वतःच्या कलागुणांना वाव द्यावं आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये उत्तम पद्धतीने यश संपादन करा व नावलौकिक मिळवामा. सौ. स्वप्न नरेंद्र काळे पाटील जिल्हा संसाधन व्यक्ती (DRP) PMFME योजना MSRLM उमेश अभिजन यांनी प्रत्येक घटकांमध्ये विशिष्ट कोणत्याही परिस्थितीमध्ये सकारात्मक विचारांना प्राधान्य द्या स्वतःमध्ये चांगले बदल घडवा उत्तम शरीरयष्टी कमवा प्रामाणिकपणे काम करा या मकर संक्रांतीच्या निमित्त चांगले संकल्प करा व पूर्ण करण्यासाठी

प्रयत्न करा महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ .आनंद कुलकर्णी यांनी सहभागी असलेल्या सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांचे कौतुक केले. व प्रमुख पाहुण्यांचे देखील ऋण व्यक्त करून विद्यार्थ्यांनी सतत कार्यरत रहावे असा संदेश दिला .

प्रोफेसर व वाणिज्य विद्याशाखा समन्वयक डॉ. एस. डी. टाकळकर यांनी या या दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. विज्ञान शाखा समन्वयक डॉ. रसूल जमादार कला शाखा समन्वयक डॉ. शरद काफले यांनी शुभेच्छा दिल्या प्रमुख पाहुण्यांची ओळख व सन्मान वाणिज्य संशोधन केंद्रप्रमुख डॉ .जे .पी .भोसले यांनी करून दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवसाय प्रशासन प्रमुख डॉ. ए. आर .घुमटकर यांनी केले. विविध गुणदर्शक कविता चारोळ्या, उखाणे यांचे वाचन डॉ .एस .ए .जगदाळे यांनी केले. या वेळी काही विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले विविध प्रकारच्या कविता चारोळी उखाणे अशा विविध कालांना उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.काही प्राध्यापकांनी सुद्धा काव्यवाचन व गीत गायन करून प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. डॉ. व्ही डी पाटे ,डॉ ए. ए. जगदाळे प्रा अपेक्षा शिंदे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैशाली मोढवे यांनी केले तर आभार डॉ.सविता खरात यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

22 जानेवारी 2026- Teacher training workshop for teachers of business law and English (as per national education policy (NEP) 2020)”

ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नारायणगाव वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र आयोजित "Teacher training workshop for teachers of business law and English" आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.विजय खरे (Dean faculty of humanities, S.P.P.U Pune) यांनी NEP 2020 नवीन अभ्यासक्रमाबद्दल माहिती देऊन शिक्षक हे पुढची युवा पिढी घडविण्याचे कार्य करतात शिक्षण हे वाघिणीचे दूध असून शिक्षणाने व्यक्ती सुशिक्षित व सुसंस्कृत होते. शिक्षणाच्या बाबतीत शैक्षणिक क्षेत्रातील भविष्यातील असणारी आव्हाने यावर मार्गदर्शन करून हे Workshop आयोजित केल्याबद्दल सर्वांना शुभेच्छा दिल्या.

ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल तात्या मेहेर यांनी देखील शिक्षकांसाठी देखील असे प्रोग्राम घेऊन विद्यार्थ्यांना परिपूर्ण माहिती देण्यासाठी आवश्यक आहे तसेच हा वर्कशॉप घेतल्याबद्दल सर्वांचे विशेष कौतुक करून शुभेच्छा व्यक्त केले

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी.कुलकर्णी यांनी देखील प्रास्ताविकेमधून अनेक ठिकाणावरून आलेल्या प्राध्यापकांना विशेष शुभेच्छा दिल्या सर्वांचे ऋण व्यक्त केले. वाणिज्यविद्या शाखा

समन्वयक प्रो. डॉ. एस. डी. टाकळकर सर यांनी देखील प्रमुख पाहुण्यांची ओळख व सन्मान केला. त्या म्हणून ती मंडळाचे विश्वस्त सं. प्रकाश मामा पाटे यांनी देखील शुभेच्छा व्यक्त केल्या. या उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्ही. टी पाटे तर आभार प्रा.सविता खरात यांनी मानले.

या कार्यक्रमातील द्वितीय सत्रामध्ये मा.डॉ. गोविंद डुंबरे (सदस्य व्यवसाय कायदा अभ्यास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) मा. डॉ. ज्ञानदेव निटवे (निमंत्रित सदस्य व्यवसाय कायदा अभ्यास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) मा. डॉ. शिरीष गावडे (सदस्य व्यवसाय कायदा अभ्यास मंडळ) मा. डॉ. नालंदा वाणी (निमंत्रित सदस्य व्यवसाय कायदा अभ्यास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) मा. डॉ. गणेश पाटील (के.टी.एच.एम. कॉलेज नाशिक मा. डॉ. व्ही. बी. बोरस्ते उपप्राचार्य के.टी.एच.एम.कॉलेज नाशिक मा. डॉ. अशोक मोजाड) (सदस्य व्यवसाय कायदा अभ्यास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) डॉ. विजय निकम (वाणिज्य विभाग प्रमुख अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर)

अशा विविध मान्यवरांनी आपली मनोगत व्यक्त केली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय वाणिज्य संशोधन केंद्र प्रमुख डॉ. जे.पी. भोसले यांनी केला व

दुसऱ्या सत्रातील अध्यक्षीय मनोगत (प्रोफेसर, प्रमुख व समन्वयक वाणिज्य विद्या शाखा अध्यक्ष व्यवसाय कायदा अभ्यास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांनी व्यक्त केले. या दुसऱ्या सूत्राचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अनुराधा घुमटकर यांनी केले तर आभार डॉ. आबा जगदाळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी इतर महाविद्यालयातून एकूण 100 ते 120 प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी देखील उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. व्ही. एस.मोढवे. प्रा. डॉ. एस.ए. जगदाळे. प्रा. अपेक्षा शिंदे यांनी केले.

31 जानेवारी 2026- 10th International Conference 2026

ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव पुणे अंतर्गत वाणिज्य विभाग संशोधन केंद्राच्या वतीने दिनांक 31 डिसेंबर 2026 रोजी आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिषदेचे आयोजन करण्यात आले. सदर परिषद ही जागतिक प्रगतीसाठी ज्ञान व परिवर्तनाच्या प्रभावावर आंतरराष्ट्रीय अंत :विषय परिषद (Interdisciplinary Innovation Transforming Society and Industry)

या विषयावर आयोजित करण्यात आली. संबंधित आंतरराष्ट्रीय परिषद दुबई, बँकॉक, थायलंड कॅनडा झारखंड छत्तीसगड हैदराबाद मुंबई भारतातील विविध राज्यातील प्राध्यापक संशोधक वकील डॉक्टर आणि विद्यार्थी उपस्थित होते 240 रिसर्च पेपर जगभरातून आले होते. सदर आंतरराष्ट्रीय परिषद विकसित होण्यासाठी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर,

अध्यक्ष प्रकाश पाटे, कार्यवाह रवींद्र पारगावकर उपकार्याध्यक्ष डॉक्टर अनंत कुलकर्णी उपकार्यवाह अरविंद मेहेर या सर्वांचे मार्गदर्शन मदत व सहकार्य लाभले.

या कॉन्फरन्ससाठी प्रमुख पाहुणे डॉक्टर सुरेशकुमार मधुसूदन (Indo GUF and Middle East chamber of Commerce Dubai UAE) डॉक्टर प्रसन्न देशमुख (International Speaker)डॉक्टर मोनिका शर्मा (Vice Chancellor KK Modi University durg Chhattisgar, th India) Inauguration program चे प्रमुख पाहुण्यांची ओळख व सन्मान डॉक्टर जे पी भोसले यांनी केला तर प्रास्ताविक प्राचार्य आनंद कुलकर्णी यांनी केले या प्रोग्रामचे आभार कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एम .बी भुजबळ यांनी मानले. या कार्यक्रमासाठी

बँकॉकचे डॉक्टर अरुण सैनिक कॅनडाचे डॉक्टर मनोज जैन राहुरी विद्यापीठातील डॉक्टर रोहित निरगुडे इंटरनॅशनल स्पीकर रूपा पाटील पुणे येथील श्वेता बापट मुंबई येथील डॉक्टर पराग मिरल आसामचे डॉक्टर बनिक सर मुंबईचे सीए मोतीलाल भवनानी सर झारखंडच्या डॉक्टर स्वर्णलता छत्तीसगडच्या डॉक्टर लीलाधर गवळे विशाखापट्टणमचे डॉक्टर पि.हनुमंतराव, समारोप कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मुंबईचे हर्षा गोयल हैदराबादचे डॉक्टर वाय डब्ल्यू सूर्यनारायण यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. वाणिज्य विभाग समन्वयक डॉक्टर एस डी टाकळकर यांनीही मार्गदर्शन केले. व्यवसाय प्रशासन प्रमुख डॉक्टर अनुराधा घुमटकर यांनी देखील मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा वाव्हळ, प्रा सोनवणे यांनी केले तर आभार सविता खरात यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयातील आर्ट्स कॉमर्स सायन्स व बीबीए बीसीए विभाग यामधील सर्व प्राध्यापकांनी केले.

14 **मार्च** One Day Seminar on Career in Commerce & Management

ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र आयोजित One Day Seminar on Career in Commerce & Management या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले प्रमुख पाहुणे माननीय अरिजित दत्ता यांनी विद्यार्थ्यांना ग्रॅज्युएशन नंतर काय करावे याबद्दल माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली तसेच भविष्य कालावधीत जॉबच्या असणाऱ्या संधी याबद्दल माहिती दिली. माननीय गुरु सुभाष भविष्य यांनी भविष्यामध्ये कॉमर्स मॅनेजमेंट असणाऱ्या संधी व विविध कोर्सेस विषय माहिती देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग समन्वयक प्राध्यापक डॉ. एस.डी. टाकळकर यांनी केले प्रा.डॉ. जे.पी भोसले व डॉक्टर ए आर घुमटकर यांनी कार्यक्रम प्रसंगी मनोगत व्यक्त करून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष मनोगत महाविद्यालयाचे प्राचार्य

डॉक्टर ए बी कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमासाठी एकूण 120 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. वैशाली मोढवे डॉ. सारिका जगदाळे, प्रा.

सविता खरात सूत्रसंचालन डॉक्टर विनोद पाटे यांनी केले तर आभार डॉ.आबा जगदाळे यांनी मानले.

27 **मार्च** Educational Visit (Commerce & Management)

ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र आयोजित D.C.R.C Student's of Savitribai fule pune University Pune.Educational Visit (Commerce & Management) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वाणिज्य विद्या शाखेतील स्वप्निल कुलकर्णी, सुरेंद्र अवघडे, , हिमानी राजपूत, श्रेयश बेंगळे,रूपाली शेतकल मॅडम यांनी संपूर्ण ग्रामोन्नती मंडळाचे महाविद्यालयाचे संपूर्ण व्यवस्थापन कमिटीचे आभार मानले व मनोगत व्यक्त केले.वाणिज्य विभाग समन्वयक प्राध्यापक डॉ. एस.डी. टाकळकर यांनी ग्रामीण भागातील असलेले वातावरण व संस्कृती याबद्दल मनोगत व्यक्त केले. प्रा.डॉ. जे.पी भोसले यांनी भविष्यात खूप मोठे व्हा चांगल्या पदाला अग्रेसर राहा अशा शुभेच्छा कार्यक्रम प्रसंगी व्यक्त करून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष मनोगत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कुलकर्णी यांनी महाविद्यालयाचे संस्थापक गुरुवर्य नानासाहेब सबनीस त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले व सर्व विद्यार्थ्यांना ग्रामोन्नती मंडळाच्या वतीने शुभेच्छा दिल्या. या प्रत्यक्ष भेटीसाठी एकूण 125 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. आबा जगदाळे,डॉ. वैशाली मोढवे डॉ. सारिका जगदाळे, प्रा.

सविता खरात, प्रा.अपेक्षा शिंदे यांनी केले सूत्रसंचालन डॉक्टर विनोद पाटे यांनी केले तर आभार अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक आकाश कांबळे यांनी मानले.

वाणिज्य विभाग

वार्षिक अहवाल 25-26

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, शैक्षणिक वर्ष 2025-2026 या वर्षाचा वाणिज्य विभागाचा अहवाल .

प्रथम **द्वितीय** व तृतीय वर्षातील प्रथम **पाच** विद्यार्थ्यांचे क्रमांक पुढील प्रमाणे.

प्रथम वर्ष - 2024-25

प्रथम क्रमांक-	**खिल्लारी प्रतीक्षा सुनील.**	**टक्केवारी-**88.46
द्वितीय क्रमांक -	**ठोंबरे मयुरी अनिल.**	**टक्केवारी** 87.86
तृतीय क्रमांक-	**अन्सारी फातिमा खातून इजहार.**	**टक्केवारी** 87.38.
तृतीय क्रमांक-	**पाटे श्रद्धा संतोष.**	**टक्केवारी** 87.38.
चतुर्थ क्रमांक-	**शिंदे तन्वी ज्ञानेश्वर.**	**टक्केवारी** 87.32
पाचवा क्रमांक-	**भोर पायल अशोक.**	**टक्केवारी** 85.70.

द्वितीय वर्ष -2024-25

प्रथम क्रमांक-	**टेमगिरी साक्षी विजय.**	**टक्केवारी** 80.84
द्वितीय क्रमांक-	**पटेल नामिरा सलाउद्दीन.**	**टक्केवारी**79.76
तृतीय क्रमांक-	**मोरडे समृद्धी नवनाथ.**	**टक्केवारी** 79.22
चतुर्थ क्रमांक-	**डुकरे तनुजा विकास.**	**टक्केवारी** 78.92
चतुर्थ क्रमांक-	**नेहरकर मयुरी विलास.**	**टक्केवारी** 78.92

चतुर्थ क्रमांक- **शिरतार मंगेश.** **टक्केवारी** 78.92

पाचवा क्रमांक- **गुजर अनन्या पृथ्वीराज.** **टक्केवारी** 78.**08**

तृतीय वर्ष-2024-25

प्रथम क्रमांक- **पानमंद प्राजक्ता गोरक्ष.** **टक्केवारी-** 84.20

द्वितीय क्रमांक- **भोर ऐश्वर्या खंडू.** **टक्केवारी** 81.80

तृतीय क्रमांक- **विशे दिपाली दत्तात्रेय.** **टक्केवारी** 80.60

चतुर्थ क्रमांक- **वाघ प्रीतम संतोष.** **टक्केवारी-**80.24

चतुर्थ क्रमांक- **वाघ साक्षी रवींद्र.** **टक्केवारी-**80.24.

पाचवा क्रमांक- **मिसाळ साक्षी अविनाश.** **क्केवारी-** 79.76

पाचवा क्रमांक- **नेहरकर श्रुती रवींद्र.** **टक्केवारी** -79.76

2025-26 या वर्ष वर्षात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

1-23 जुलै 2025- प्रथम वाणिज्य राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एक दिवसीय विशेष व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली**. (One Day Workshop Introduction of National Education Policy NEP - 2020.)**

2- 29 जुलै 2025 करियर कौन्सिलिंग सेमिनार ऑन कॉस्ट मॅनेजमेंट अकाउंट या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.

3- 6 ऑगस्ट 2025 प्रथम वर्ष स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले.

4- 5 ऑगस्ट 2025 द्वितीय वर्ष एनएपी प्रोग्राम एस.वाय. बी.कॉम.on - Inplemenentation of national Education policy (NEP) one day seminar 2020.

5-शिक्षकांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 5 सप्टेंबर 2025 रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

6- वाणिज्य विभाग व संशोधन केंद्र आणि बीबीए, बीसीए विभागामार्फत दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी विशेष व्याख्यानमाला आयोजीत करण्यात आली.

7-1 जानेवरी 2026 वाणिज्य विद्या शाखा व संशोधन केंद्र आयोजित नवीन वर्ष स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले.

8-14 जानेवारी 2026 मकर संक्रात तिळगुळ वाटप व विविध गुणदर्शन कार्यक्रम कार्यक्रम" उत्साहात साजरा झाला

9-**22** जानेवारी 2026-"Teacher training workshop for teachers of business law and English (as per national education policy (NEP) 2020)" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

10-**31** जानेवारी 2026-10th International Conference 2026 आयोजन करण्यात आले.

11-14 **मार्च** One Day Seminar on Career in Commerce & Management

12-27 **मार्च** Educational Visit (Commerce & Management)